आजारी लघु उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी
राज्यस्तरीय/विभागीय स्तरावर समित्यांची
नेमणूक.

महाराष्ट्र शासन,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एसयूसी-१०८८/८९९/उद्योग-१०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २६ मार्च १९९२.

## प्रस्तावना

औद्योगिक घटकातील आणि विशेषत: लघु उद्योगांच्या बाबतीत आजारीपण ही आता चिंतेची बाब झाली आहे. खेळत्या भांडवलाचा अभाव, जुन्या अप्रचलित तंत्रांचा वापर, प्रतिकूल बाजारपेठा, व्यवस्थापनातील अपुरेपणा तर कधी कच्च्या मालाची दुर्मिळता या व अशा विविध प्रकारच्या कारणांमुळे लघु उद्योग घटक आजारी होतात. अशा आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन करण्यामागे राज्य शासनाचे मुख्यत्वेकरुन दोन हेतू आहेत. त्यात जास्तीत जास्त कामगारांच्या रोजगाराचे संरक्षण हा पहिला तर सदर उद्योग घटकामध्ये यापूर्वी केलेल्या गुंतवणूकीचा भविष्यकाळात फायदेशीर विनियोग कसा करुन घेता येईल हे पाहणे हा दुसरा मुख्य हेतू आहे. यासाठी राज्यातील अशा आजारी लघु उद्योग घटकांच्या पुनरुज्जीवनासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता राज्य शासनाने विकास आयुक्त [उद्योग] यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती केली होती व या समितीने लघु उद्योगातील आजारपण, त्याची कारणमिमांसा सध्या होत असलेले प्रयत्न तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने याबाबतीत घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे या सर्वांचा सर्वंकष अभ्यास करुन शासनास आपला अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये लघु उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी उपाययोजना सुचविण्यात आली आहे. त्यात मुख्यत्वेकरुन आजारी लघु उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी राज्यस्तरावर तसेच विभागीय स्तरावर समित्या नेमण्याची शिफारस करण्यात आली आहे. या सर्व शिफारशींवर मंत्रिमंडळ पातळीवर निर्णय घेण्यात आले आहेत व त्यानुसार राज्य शासनाशी संबंधित असलेल्या सवलती प्रदान करण्याची बाब तसेच सदर समित्या गठीत करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राज्य शासनाच्या उद्योग संचालनालयाकडे "लघु उद्योग" म्हणून नोंदणी झालेल्या व भारतीय रिझर्व्ह बँकेने आजारी उद्योगाच्या केलेल्या व्याख्येस पात्र

ठरणा-या लघु उद्योगांच्या पुनरूज्जीवनाच्या कार्यास गती यावी व याबाबत लवकर निर्णय होऊन पुनरूज्जीवनाचा शुश्रूषा कार्यक्रम तात्काळ कार्यान्वित व्हावा या हेतूने अशा आजारी लघु उद्योगांच्या राज्यस्तरीय व प्रत्येक महसूल विभागासाठी एक अशा विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे समित्यांची शासन नियुक्ती करीत आहे :-

अ] राज्यस्तरीय समिती.

| | |
|---|---|
| १] विकास आयुक्त [उद्योग] | - अध्यक्ष. |
| २] रिझर्व्ह बँक प्रतिनिधी | सदस्य. |
| ३] स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, देना बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे प्रतिनिधी. | सदस्य. |
| ४] व्यवस्थापकीय संचालक, महावित्त | सदस्य. |
| ५] व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम | सदस्य |
| ६] उर्जा विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७] विक्रीकर आयुक्त | सदस्य |
| ८] उद्योजकांच्या राज्यस्तरीय संघटनेचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ९] अतिरिक्त उद्योग संचालक | सदस्य सचिव. |

ब] विभागीय स्तरीय समिती [प्रत्येक महसूल विभागासाठी]

| | |
|---|---|
| १] विभागीय आयुक्त [महसूल] | अध्यक्ष, |
| २] प्रमुख वाणिज्यिक बँकांचे [स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, देना बँक, बँक ऑफ महाराष्ट्र] प्रतिनिधी. | सदस्य |
| ३] महावित्तचे प्रतिनिधी | सदस्य. |
| ४] सिकॉमचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५] उर्जा विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६] संबंधित विक्रीकर उपायुक्त | सदस्य |
| ७] उद्योजकांच्या संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य. |

....३....

८] संबंधित विभागीय उद्योग सह संचालक किंवा अधीक्षकीय उद्योग अधिकारी. सदस्य सचिव.

१.१ संबंधित विभागीय समित्यांवर तसेच राज्यस्तरीय समितीवर काम करण्यासाठी उद्योजकांच्या संघटनांचे प्रतिनिधी नेमण्याविषयीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

१.२ मुंबई महानगर प्रदेश व कोकण महसूल विभागासाठी एकच समिती राहील.

१.३ वरील समित्यांवर भारतीय रिझर्व्ह बँकेने तसेच संबंधित बँकांनी आपले प्रतिनिधी तात्काळ नियुक्त करावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

२. आजारी उद्योगांच्या वैयक्तिक प्रकरणी निर्णय घेण्याची बाब या समित्यांच्या कक्षेत येते. ज्या लघु उद्योग घटकाकडे बँका व वित्तीय संस्थांची मिळून एकूण थकबाकी रु. २० लाखापेक्षा कमी असेल किंवा यंत्रसामुग्रीवरील गुंतवणूक रु.२० लाखापर्यंत असेल अशा लघु उद्योगांची प्रकरणे विभागीय स्तरावरील समितीच्या कक्षेत असतील तर या मर्यादेपेक्षा थकबाकी अथवा यंत्रसामुग्रीवरील गुंतवणूक अधिक असेल तर अशी प्रकरणे राज्य स्तरावरील समितीच्या कक्षेत येतील.

३. समितीचे मुख्य कार्य खालीलप्रमाणे असेल :-

[अ] आजारीपणाची कारणे आणि आजारी घटकाची संभाव्य जीवनक्षमता पडताळून पहाण्याच्या दृष्टीने योग्य त्या विहित प्रपत्रामध्ये आजारी लघु उद्योग घटकाकडून माहिती मागविणे. [सदर प्रपत्रे उद्योग संचालनालयाने विहित करावयाची आहेत.]

[ब] आजारी घटकांच्या संभाव्य जीवनक्षमतेबाबत संबंधित बँका/वित्तीय संस्था अथवा स्वतः उद्योजक यांचेद्वारे तयार करण्यात आलेल्या पुनरुज्जीवन योजनेचे परिक्षण करणे.

[क] सर्व संबंधितांना मान्य असेल अशी घटकांची संभाव्य जीवनक्षमता निश्चित केल्यानंतर यासंबंधात संस्थांकडून अपेक्षित सवलती/त्यागाची मर्यादा स्पष्ट करणे.

[ड] ज्या प्रकरणामध्ये पुनरुज्जीवन योजनांना संमती देण्यात आली आहे, अशा योजनांबद्दल संनियंत्रणासाठी नियतकालिक आढावा घेणे.

....४....

३.१ उपरोक्त बाबीसाठी राज्य शासनाचे संबंधित विभाग, आणि वित्तीय संस्था यांच्याकडून माहिती मागविण्याचे तसेच त्यास आवश्यक प्रपत्र/विवरणपत्र विहित करण्याचे अधिकार या समितीस राहतील.

३.२ ज्या घटकांच्या पुनरुज्जीवन कार्यक्रमास समितीने मान्यता दिली आहे अशा उद्योग घटकांना संबंधित समितीचे सदस्य सचिव "आजारीपणाबाबतचे प्रमाणपत्र" देतील. सुरुवातीला या प्रमाणपत्राची कालमर्यादा एक वर्ष राहील व त्यानंतर संबंधित समितीने पुनरुज्जीवन कार्यक्रमाबाबत आढावा घेतल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात यावा.

४. आजारी लघु उद्योग घटकासाठी पुनरुज्जीवनासाठी शुश्रूषा कार्यक्रम मान्य करण्याचे ठरविल्यानंतर त्यामध्ये जर विक्रीकर, राज्य विद्युत मंडळाकडील देणी व इतर शासकीय देणी अशा थकबाकीबाबत सवलती अपेक्षित असतील तर स्थगित करावयाचा विक्रीकर, विद्युत मंडळाची देणी व इतर शासकीय थकबाकी व त्यावरील व्याज खालीलप्रमाणे भरण्याची सवलत देण्याचे अधिकार या समित्यांना राहतील.

[१] समितीकडे अर्ज केल्याच्या दिनांकास जी मूळ रक्कम, व्याज व दंडनीय व्याज थकीत असेल ती रक्कम ही थकबाकी म्हणून समजण्यात यावी.

[२] शुश्रूषा कार्यक्रम अंमलात येण्याच्या दिनांकापासून [ कट ऑफ डेट ] थकबाकीवर वार्षिक १३ टक्के व्याज आकारुन मूळ रक्कम व व्याजाची रक्कम जास्तीत जास्त ३६ मासिक हप्त्यात वसूल करण्याची सवलत देण्यात यावी.

P

४.१ पुनरुज्जीवनाची योजना त्वरित कार्यान्वित व्हावी या दृष्टीकोनातून योजनेमध्ये निर्देशित केलेल्या/मान्य करावयाच्या सवलती, आवश्यक तेथे कमाल मर्यादेपर्यंत मान्य करण्याचे अधिकार शासकीय विभागाच्या समितीवरील प्रतिनिधींना विशेषत: विक्रीकर व राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीबाबतचे अधिकार प्रदान केले जावेत.

....५....

समित्यांची कार्यपध्दती :-

५. शासनाने नियुक्त केलेल्या वरील समित्या या आजारी उद्योगांच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीकोनातून गठीत केल्या असून त्या पूर्णपणे अशासकीय विधानिक स्वरुपाच्या आहेत. या समित्यांच्या कार्याचे यशापयश हे संपूर्णपणे संबंधित शासकीय विभागांनी तसेच बँका व वित्तीय संस्थांनी आणि स्वत: आजारी उद्योगांनी देऊ केलेल्या सहकार्यावर व सवलतीवर अवलंबून आहे.

५.१ या विभागीय व राज्यस्तरावरील समित्यांची बैठक दरमहा ठराविक दिवशी घेण्यात यावी अशी अपेक्षा आहे. तसेच समित्याकडे आजारी उद्योगाचे प्रकरण प्राप्त झाल्यानंतर ६ महिन्यांच्या आंत पुनरुज्जीवनाबाबत समितीने निर्णय द्यावा, असे अपेक्षित आहे.

५.२ समितीचा निर्णय अंतिम स्वरुपाचा असेल व केवळ अपवादात्मक परिस्थितीत बँका व वित्तीय संस्थांनी पुनर्विचार करुन ठोस प्रस्ताव सादर केला तर अशा प्रस्तावावर समित्यांना पुनर्विचार करता येईल.

६. या समित्यांची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे :-

[१] लघु उद्योग घटकांनी संबंधित बँका/वित्तीय संस्था यांच्यामार्फत पुनरुज्जीवनासाठी आपला अर्ज विहित नमुन्यात समितीसमोर सादर करावयाचा आहे.

[२] या अर्जाचा विचार करुन घटकाच्या पुनरुज्जीवन क्षमतेबाबत संपूर्ण अभ्यास करुन संबंधित बँकानी/वित्तीय संस्थांनी अथवा स्वत: लघु उद्योजकाने आपल्या पुनरुज्जीवनासंबंधीचा अहवाल तयार करावयाचा आहे.

[३] आजारी उद्योग घटकाच्या पुनरुज्जीवनासंबंधीचा अहवाल बँकानी/वित्तीय संस्थांनी संबंधित समितीच्या सदस्य सचिवांकडे पाठवावयाचा आहे.

[४] बँकानी/वित्तीय संस्थांनी तयार केलेल्या अशा पुनरुज्जीवनासंबंधीच्या अहवालावर विचार करुन तसेच सदर अहवालामध्ये ज्या ज्या शासकीय विभाग, वित्तीय संस्था, बँका, लघु उद्योजक व ज्यांच्याकडून सवलती अपेक्षित आहेत अशा सर्व संबंधित संस्थेच्या मान्यतेने, आवश्यक असेल तर अशा पुनरुज्जीवनासंबंधीच्या अहवालामध्ये बदल सुचवून, सदर अहवाल मंजूर करावयाचा आहे.

....६....

[५] समितीवर ज्या ज्या विभागांना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे असे विभाग सोडून इतर विभाग/संस्थां यांच्याकडून जर पुनरुज्जीवन अहवालाप्रमाणे काही सवलती अपेक्षित असतील तर अशा विभाग/संस्था यांच्या प्रतिनिधींना "विशेष आमंत्रित" म्हणून बोलाविण्याचा अधिकार सदर समितीच्या अध्यक्षांना देण्यात येत आहे.

७. वर परिच्छेद ४ मधील सवलतीव्यतिरिक्त जादा सवलती किंवा मुंबई सहाय्यक उपक्रम [विशेष तरतूद] अधिनियम, १९५८ अन्वये घटकास "सहाय्यक उपक्रम" म्हणून घोषित करणे आवश्यक असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव योग्य समर्थनासह समितीने उद्योग संचालनालयामार्फत शासनास सादर करावा. या समितीसमोर विचारार्थ येणा-या आजारी उद्योगाकडून कोणत्याही प्रकारची प्रोसेस फी अथवा इतर आकार घेण्यात येऊ नये. या समितीवर नियुक्त केलेल्या प्रतिनिधींना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अथवा दैनिक भत्ता देय होणार नाही. तसेच या समितीसाठी आवश्यक असलेली सर्व प्रशासकीय सेवा ही त्या त्या विभागाचे उद्योग सह संचालक/अधीक्षक उद्योग अधिकारी यांनी तसेच राज्यस्तरीय समितीबाबत उद्योग संचालनालयाने द्यावयाची आहे.

८. विभागीय समितीच्या कामकाजाबाबत काही अडचणी उद्भवल्यास त्याबाबत निर्णय देण्याचे अधिकार विकास आयुक्त [उद्योग] यांना देण्यात येत आहेत. राज्यस्तरावरील समितीबाबत असे अधिकार सचिव [उद्योग]यांना राहतील.

९. भविष्यकाळात लघु उद्योग घटकाबाबतची जी प्रकरणे शासनाकडे संदर्भित केली जातील ती प्रकरणे उद्योग संचालनालयाकडे पाठविली जावीत आणि उद्योग संचालनालयाद्वारे सदर प्रकरणे राज्य अथवा विभागीय समितीसमोर ठेवली जावीत.

१०. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ. वि. दे

शासनाचे

प्रत:

सचिव, वित्त विभाग,

विक्रीकर आयुक्त, विभागीय विक्रीकर उपआयुक्त.

सचिव [ऊर्जा], उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

* सचिव, वित्त मंत्रालय [बँकींग विभाग] भारत सरकार नवी दिल्ली.

* सचिव, उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

* गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई.

सर्व विभागीय आयुक्त.

सर्व जिल्हाधिकारी

मंत्री [उद्योग] यांचे खाजगी सचिव,

राज्यमंत्री [उद्योग] यांचे स्वीय सहाय्यक.

उपमंत्री [उद्योग] यांचे स्वीय सहाय्यक.

सर्व उद्योग सह संचालक / सर्व अधीक्षकीय उद्योग अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.

व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

उद्योग विभागांतर्गत सर्व महामंडळे.

* सर्व संबंधित बँकांचे व्यवस्थापकीय संचालक,

उद्योग मित्र,

उद्योजकांच्या संघटना,

सर्व मंत्रालयीन विभाग,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क / निवड नस्ती.